माझ्या रसिक मित्र बंधुभगिनींनो, नमस्कार !

मी कोल्हापूरचाच. माझ बालपण, तारुण्य, कोल्हापूरात गेलं. कोल्हापूर ही माझी कर्मभूमी, मी जे कर्म केलं म्हणजे कलेची सेवा केली त्याच फलित आता मला सोलापूरात मिळतयं. ८८ व्या नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष करुन तुम्ही मला जो आनंद, प्रेम, मान आणि उत्साह दिला त्याबद्दल मी आपला सर्वांचा अत्यंत आभारी आहे !!!

मला वाटंत माझ्या वयाच्या १३-१४ व्या वर्षी मी प्रथम सोलापूरात आलो. माझी लाडकी मोठी बहीण इंदू हिचा विवाह श्री. मोहनसिंह बंकटसिंह बायस ह्यांच्याबरोबर सोलापूरातल्या चौपाड्यात खूप थाटामाटात झाला. वरातीत मी घोड्यावर बसलो होतो. माझ्या पुढे बँड चालला होता. माझ्या मागून बँडचे एक पथक चालले होते. आतषबाजी जोरात चालली होती. मागून येणाऱ्या गाडीत नवरा नवरी नटून थटून बसले होते. मोहनसिंहच्या परिवारातल्या पुष्कळ बायका, पुरुष वरातीत होते. पैसे फेकले जात होते आणि त्यावेळी माझ्या हातात रूपयाच एक नाणं येऊन पडलं. मला खूप बर वाटलं आणि मग मी पैसे घेण्यासाठी हात पुढे करत राहिलो. आणि मग तो एक चाळाच सुरु झाला माझा. जसा पहिल्या पावसाच्या वेळी आनंदाने प्रत्येक थेंब हातात घेण्याचा आपण चाळा करतो तसा. त्या क्षणी मी सोलापूरच्या प्रेमात पडलो आणि योगयोग कसा बघा, माझ्या मोठ्या बंधुनीही सोलापूरातल्याच मुलीशी प्रेमविवाह केला. त्यामुळे सोलापूराच्या फेऱ्याही वाढल्या आणि प्रेमही वाढलं. सिद्धेश्वराचं मंदिर, त्यासमोर असलेला तो सुंदर तलाव आणि त्याला लागून असलेला भव्य किल्ला ही माझी आवडीची स्थळं आहेत. किल्ल्यात तासन्तास भटकणे हा माझा छंद होता आणि आहे. ह्याच किल्ल्यात मी शुटींगही केलं. इतकच नव्हे तर मी अजिंक्य थियेटर्स ही नाट्य संस्था सुरु केली आणि त्या संस्थेतर्फे फोन नं. ३३३३ या नाटकाचा पहिला प्रयोग सोलापूरातच भागवत थियेटरमध्ये केला आणि तो सोलापूरकरांनी यशस्वी केला आणि माझी नाट्यसंस्था यशस्वीपणे सुरु झाली.

सोलापूर ही सिध्देश्वराची कृपा असलेली पुण्यनगरी. श्री. रा. ना. पवार, कवी संजीव आणि त्र्यं. वि. सरदेशमुखांची कर्मभूमी. रंगेल आणि रंगेल लावण्यांनी पुर्ण महाराष्ट्राला मोहवून टाकणारे शाहीर रामजोशी सोलापूरचेच. त्याचप्रमाणे डॉ. कोटणीस ह्यांनी सोलापूरचं नाव फक्त भारतातच नव्हे सगळ्या जगभर नेलं. डॉ. कोटणीस व